बोदवड परिसर उपसा सिंचन योजना, ता.बोदवड, जि. जळगाव या प्रकल्पाच्या रु.२१७८.६७ कोटी किंमतीच्या तृतीय सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आलेली आहे, त्यातील अट क्र. ४ शिथिल करण्याबाबतचा निर्णय...

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांक: बोदवड ०५१० /(प्र.क्र.२७९/१०)मोप्र-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २० सप्टेंबर, २०१९.

पहावे:- १) शासन निर्णय क्र. बोदवड०५१०/(प्र.क्र.२७९/१०)मोप्र-१), दि.०३/०१/२०१७.

पार्श्वभूमी :

बोदवड परिसर उपसा सिंचन योजना, ता. बोदवड, जि. जळगाव या प्रकल्पाच्या रु.२१७८.६७ कोटी इतक्या किंमतीच्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दि. ०३/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेचे काम सुरु करणेस अट क्र. १ ते ६ च्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये अट क्र. ४ **"प्रकल्पासाठी मंजूर झालेली रु.५०० कोटीची केंद्रीय अर्थसहाय्याची रक्कम प्राप्त करुन घेऊन ती टप्पा-१ च्या कामासाठी खर्च करावी. त्यानंतरच राज्य शासनाची तरतूद खर्च करावी"** अशी आहे.

बोदवड प्रकल्पास केंद्राने रु.५००/- कोटी अर्थसहाय्य मंजुर केले होते. त्यापैकी रु.६६.६६ कोटी केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. बोदवड प्रकल्पास अर्थसहाय्य PMKSY किंवा तत्सम योजनेमध्ये प्राप्त झाले नाही. केंद्राकडून प्रकल्पास निधी मिळण्यासाठी प्रकल्पाची भौतिक व आर्थिक प्रगती ५०% पेक्षा जास्त झालेली असावी असे निकष आहेत. ५०% भौतिक प्रगती साध्य करण्यासाठी आर्थिक प्रगती (खर्च) होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे प्रस्तुत अट वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शुध्दीपत्रकः

दि.३/१/२०१७ च्या शासन निर्णयातील अट क्र.४ **"प्रकल्पासाठी मंजूर झालेली रु.५००/- कोटीची केंद्रीय अर्थसहाय्याची रक्कम प्राप्त करुन घेऊन ती टप्पा-१ च्या कामासाठी खर्च करावी. त्यानंतरच राज्य शासनाची तरतूद खर्च करावी."** ही अट वगळण्यात येत आहे.

सदर शुद्धिपत्रक शासनाच्या सर्वोच्च प्राधिकाराच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९२०२०२५४४८७२७ असा आहे. हे शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2019.09.21 11:07:17 +05'30'

(सं. रा. तिरमनवार)

शासनाचे उप सचिव

प्रत-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
५) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
६) मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ.